# श्री.अजयकुमार नष्टे,उपविभागीय अधिकारी,जत उपविभाग जत यांचे न्यायालयात.

दुरध्वनी क्रं. 02344/246134 Email-sdojath5@gmail.com

क्र.आरटीएस/अपिल/३८/२०२३

दिनांक- २४.०२.२०२५

**प्रति,**

१. तुकाराम भिमराव कोडग
२. रणजित भिमराव कोडग
३. संभाजी हरिबा कोडग
४. भारत शंकर कोडग
५. सुभाष शंकर कोडग
६. बापू बळवंत कोडग

सर्व रा.आवंढी, ता.जत, जि. सांगली

**विरूध्द**

१. तुळसाबाई बाजीराव कोडग
२. रामचंद्र बाबासाहेब कोडग
३. शितल धनाजी कोडग
४. विनायक धनाजी कोडग
५. धनश्री धनाजी कोडग

अ.क्र.४ व ५ करीता अपाक जाबदार ३

६. अमर दिलीप कोडग
७. सुमन रामचंद्र कोडग
८. मच्छिंद्र रामचंद्र कोडग
९. धनाजी रामचंद्र कोडग
१०. हणमंत रामचंद्र कोडग
११. ललिता बापू पाटील
१२. प्रमिला साहेबराव बाबर
१३. सविता गुलाब शिंदे
१४. अनिरूध्द मारूती कोडग
१५. अनिता मारूती कोडग

अ.क्र.१४ व १५ यांचे अपाक जाबदार १२

१६. भाउसो पांडा उर्फ पंढरीनाथ कोडग
१७. शालन दत्तात्रय काशिद
१८. संपताबाई कृष्णदेव गायकवाड
१९. लालासो पांडा ऊर्फ पंढरीनाथ कोडग
२०. तुकाराम शिवाजी कोडग
२१. संजय शिवाजी कोडग
२२. परशुराम दत्तू कोडग
२३. संजय बाजीराव कोडग
२४. शहाजी बाजीराव कोडग
२५. नवनाथ बाजीराव कोडग
२६. लक्ष्मण आबा कोडग
२७. शिवाजी आबा कोडग
२८. लक्ष्मी आबा कोडग
२९. सुनिता संजय साळुंखे
३०. अनिता दत्तात्रय घाडगे
३१. पार्वती नारायण शिंदे
३२. मारूती रंगराव कोडग
३३. रेश्मा रंगराव कोडग
३४. हिराबाई रंगराव कोडग

अ.क्र.१ ते ११, १६ ते २८,३०,३२,३३,३४ रा. आवंढी, ता. जत जि. सांगली
अ.क्र.१२,१४,१५ रा.आलेगाव ता.सांगोला जि.सोलापूर
अ.क्र.१३,२९ रा.जवळा ता.सांगोला जि.सोलापूर
अ.क्र.३१ रा. वाळेखिंडी ता.जत जि.सांगली

## महाराष्ट्र जमीन महसूल अधिनियम १९६६ चे कलम २४७ प्रमाणे

## निकालपत्र

प्रस्तुत अपिल तहसिलदार,जत यांनी महाराष्ट्र जमीन महसूल अधिनियम १९६६ चे कलम १४३ अन्वये क्र.जमिन/कलम-१४३/रस्ता/एसआर/०२/२०२२, दिनांक १०.०१.२०२३, प्रकरणी दिलेल्या निर्णयावर व्यथित होऊन अपिलार्थी यांनी प्रस्तुतचे आरटीएस अपील दाखल केलेले आहे.

**प्रस्तुत अपिलकामी उभय पक्षकार यांना सुनावणीकामी रितसर नोटीसा बजाऊन म्हणणे मांडणेची पुरेशी संधी देण्यात आली.**

**अपिलार्थी यांनी त्यांचे अपील मेमोमध्ये सारांशरूपाने पुढीलप्रमाणे मुद्दे मांडले आहेत.**

१. अपेलंट यांची मौजे आवंढी, ता. जत, जि. सांगली येथील गट नं. २१७, २५९ पैकीच्या जमिनी आहेत. गट नं. २१७ व २५९ सह गट नं. २६९, २५५, २५६, २५७, २६४ च्या सरबांधाने जाबदार नं. १ ते ६ यांनी खालील कोर्टात महाराष्ट्र जमीन महसूल अधिनियम १९६६ चे कलम १४३ प्रमाणे नवीन रस्ता मागणी केलेला होता तो चुकीचा असून नैसर्गिक न्यायतत्वांचा भंग करणारा तसेच अपिलार्थी यांचेवर अन्याय करणारा असा आहे, कारण अपेलंट यांच्या गट नं. २१७ च्या दक्षिण बाजूने यापुर्वी पूर्व पश्चिम चालीचा रस्ता दिलेला होता व आहे. त्या रस्त्याने साधारणतः १५० ते २०० लोकांना त्याचा फायदा होत आहे. परत आता त्याच जमिनीतून दुसऱ्या बाजूने म्हणजे पश्चिम बाजूने रस्ता दिल्यास या अपेलंट यांचे कशानेही न भरुन येण्यासारखे नुकसान होणार आहे. शिवाय गट नं. २५५, २५६, २५८ व २५९ चे क्षेत्र पाहता क्षेत्र ०.१० आर, ०.१५, ०.२० आरच्या आत क्षेत्र आहेत. सर्वांचे क्षेत्र अत्यल्प असून, सदरच्या जमिनी ह्या बागायत जमिनीत आहेत. त्या जमिनीतून रस्ता दिल्यास अत्यल्प भूधारक जमिन धारकावर अन्याय होणार आहे.

२. मागणी केलेल्या रस्त्याचा पश्चिम बाजूला गट नं. २५४, २५५, २५६, २५७ व २५८ असा असून, त्यामध्ये कोणतेही पिक नाही. गट नं. २५८ मध्ये वैरण पिक आहे व पुर्व बाजूस गट नं. २१७ असून सदर शेत नांगरल्याचे दिसून आले. मागणी केलेल्या बांधावर १५ लिंबाची झाडे असून, काटेरी झाडे आहेत, तसेच त्यापुढे गट नं. २१७ व २५८ चे सर बांधावर दोन लिंबाची झाडे दिसून आली. केतकी व काटेरी झाडे असल्याचे दिसून आले. त्यापुढे गट नं. २६५ मध्ये अर्जदार म्हणजे यातील जाबदार नं. १ ते ६ यांचे बांधालगत पडीक विहिर असून, काटेरी झाडे असल्याचे दिसून आले. त्यानंतर पर्यायी रस्त्याबाबत विचारणा केली असता, जाबदार यांनी पश्चिम बाजूने गट नं. २६२ चे सरबांधावरुन ये जा करीत असल्याचे सांगणेत आले. वरीलप्रमाणे वस्तुस्थिती खरी असून वस्तुस्थितीचा लिहून दिला पंचनामा म्हणून दिनांक: २३/०६/२०२२ रोजी खालील मे. कोर्टानी पंचनामा केलेला आहे. सदर पंचनामेत खालील मे. कोर्टाच्या निदर्शनास खरी वस्तुस्थिती येवून देखील तसेच रस्ता देण्यास अनेक अडथळे असल्याचे लक्षात येवून देखील तसेच सदरचा रस्ता मंजूर केल्यास या अपेलंट यांचे शेतीचे फार मोठे नुकसान होवून तसेच पर्यावरणाचे देखील फार मोठे नुकसान होवून झाडांची कत्तल होणार आहे याचे देखील चित्र समोर असताना सुध्दा खालील कोर्टानी राजकीय दबावखाली जावून जो निर्णय दिलेला आहे तो या अपेलंट यांच्यावरती अन्यायकारक ठरुन सदरचा आदेश नैसर्गिक न्यायतत्वाच्या अनुसरुन दिलेला नसल्याचे हे त्यांच्याच पंचनामेवरुन दिसून येत असल्याकारणाने सदरचा आदेश हा प्रथमदर्शनी रद्द बातल करण्यास पात्र आहे.

३. मौजे आवंढी, ता. जत, जि. सांगली येथील गाव नकाशा पाहिला असता, अपेलंट व जाबदार यांच्या जमिनी आवंढी ते लोहगांव जाणाऱ्या डांबरी रस्त्याच्या पश्चिम बाजूस जमिनी आहेत. अपेलंट यांच्या जमिनी आवंढी ते लोहगांव रस्त्याच्या पश्चिम बाजूस असून, त्यांची राहती घरे देखील आहेत, तसेच त्यांच्या जमिनी ह्या अत्यल्प भुधारक म्हणून जमीन आहेत तसेच त्यांनी पश्चिम बाजूच्या सर्व शेतकऱ्यांना सोईचा रस्ता उपलब्ध करुन दिलेला आहे.

४. खालील कोर्टातील मुळ अर्जदार म्हणजेच जाबदार नं. १ ते ६ यांना पर्यायी रस्ता असून देखील मुद्दामहून त्यांनी नवीन रस्त्याची मागणी केलेली दिसून येते तरी देखील अपेलंट यांनी या जाबदार नं. १ ते ६ यांना उत्तर बाजूच्या स.नं. नंबर वरुन म्हणजेच अपेलंट यांच्या गट नं. २१० च्या उत्तर बाजूने आवंढी ते लोहगांव जाणाऱ्या डांबरी रस्त्यापासून पुर्व पश्चिम चालीचा रस्ता देण्यास तयार होते व सदरचा सर्व्हे नं. २१० च्या उत्तर बाजूस रस्ता दिल्यास तो अतिशय सुखकर व जवळचा होणार आहे तसेच सदर रस्ता दिल्यास दोन्ही शेतकऱ्यांचा कोणताही तोटा होणार नाही अगर शेतीचे अथवा निसर्गाचे हानी देखील होणार नाही. परंतु खालील कोर्टानी कोणताच विचार न करता एकतर्फा असा आदेश पारीत केलेला आहे.

५. खालील कोर्टाच्या पंचनामेवरुन प्रथमदर्शनी असे निदर्शनास येते की, मंजूर केलेला रस्ता हा जवळ जवळ १ ते १.५० कि.मी. अंतराचा असून, तो रस्ता निर्माण केल्यास अपेलंट यांचे अत्यल्प भूधारकांचे फार मोठे शेतीचे नुकसान होणार आहे, तसेच सदर रस्त्यामुळे दिर्घायुष्य असणाऱ्या लिंबांचे झाडांची कत्तल होवून निसर्गाची फार मोठी हानी होणार आहे. याचा खालील कोर्टानी कोणत्याही परिस्थितीत विचार केलेला दिसून येते नाही, तसेच शेतीचे नेमके किती क्षेत्र रस्त्यात जाणार आहे व त्याचे मुल्यमापन किती होणार आहे, तसेच दिर्घायुष्य असणाऱ्या लिंबांचे झाडांचे देखील किती मुल्य होणार आहे व निसर्गाचे किती हानी होणार आहे याचे देखील स्पष्टीकरण सदर आदेशामध्ये दिसून येत नाही. तसेच सदर दिलेल्या आदेशाप्रमाणे रस्ता निर्माण केल्यास दोन चालू पाण्याच्या विहिरी असल्याकारणाने तेथून रस्ताच निर्माण करता येणार नाही हे देखील खालील कोर्टानी दुर्लक्ष केलेले आहे.

**जाबदार १ ते ६ यांनी त्यांचे लेखी युक्तीवादामध्ये सारांशरूपाने मुद्दे मांडले आहेत.**

१. अपेलंट यांनी प्रस्तुत जाबदार यांचे विरुध्द दाखल केलेले अपील हे वस्तुस्थिती सोडून रचनात्मक व काल्पनिक मजकुराची असल्याने प्रस्तुत जाबदार यांना अमान्य आहे. अपेलंट यांनी प्रस्तुत जाबदार यांचे विरुध्द दाखल केलेले अंतरीम स्थगीती अर्ज हे वस्तुस्थिती सोडून रचनात्मक व काल्पनिक मजकुराची असल्याने प्रस्तुत जाबदार यांना अमान्य आहे.

२. जाबदार नं.१ ते ६ यानी ज्या गटातुन रस्ता मागणी केला होता त्या गटाच्या प्रत्येक सह. हिस्सेदारांना खालील कोर्टा समोर दाखल केलेल्या अर्जात आवश्यक पक्षकार केलेले होते. त्या बाबत उलघडा खालील कोर्टानी निकालपत्रात नमुद केलेल्या कलम ३ मध्ये स्पष्टपणे खुलासा केलेला आहे.

३. जाबदार नं. १ ते ६ यानी अर्ज दाखल केल्यानंतर खालील कोर्टाने सुनावणी वेळी म्हणणे मांडणे बाबत अपेलंट याना व खालील कोर्टात दाखल केलेल्या अर्जातील सर्व जाबदार याना कायदयानुसार रितसर नोटीसा काढलेल्या होत्या. खालील कोर्टातील क्रं. जमिन/रस्ता/१४३/एसआर/०२/२०२२ कामातील जाबदार नं. १ ते ९ व २१ ते ३९ यांनी जाबदार नं.१ ते ६ यानी दाखल केलेल्या अर्जास खालील कोर्टासमोर कोणत्याही प्रकारे हरकत नोंदविलेली नव्हती व नाही. उलट त्यांनी जाबदार नं.१ ते ६ यानी दाखल केलेला अर्ज मंजुर करणेस हरकत नाही असे लेखी म्हणणे खालील कोर्टात दिलेले होते.

४. तदनंतर खालील कोर्टानी क्र. जमिन/रस्ता/१४३/एसआर/०२/२०२२ चे कामी प्रत्यक्ष जागेवर जाऊन स्थळपाहणी करुन रितसर पंचासमक्ष पंचनामा केलेला होता. खालील कोर्टाने पुराव्याचे कागदपत्रे व वस्तुस्थितीचा पंचनामा यावर स्पष्ट निष्कर्ष काढुन व त्याचा बारकाईने अभ्यास करुन रिस्पॉउंट नं.१ ते ६ यानी दाखल केलेला अर्ज मंजुर केलेला आहे. तो कायदेशीररित्या बरोबर आहे.

५. अपेलंट यांनी प्रस्तुतचे अपील दाखल केल्यानंतर या अपेलंट व जाबदार नं.१ ते ६ यांचे मध्ये गांव पातळीवर चार प्रतिष्ठीत लोका समक्ष आपसात तडजोड झाल्याने व प्रस्तुत अपेलंट यांनी जाबदार नं.१ ते ६ तहसिलदार यांच्या आदेशा प्रमाणे रस्ता करणे बाबत तोंडी संमती जाबदार नं.१ ते ६ यांनी भरपुर पैसे खर्च सदर ठिकाणी तहसिलदारच्या आदेशा प्रमाणे रस्ता तयार केलेला आहे. त्या बाबतचा कागदोपत्री पुरावा म्हणजे केलेल्या रस्त्याचे छायांकित फोटो आज रोजी जाबदार यांनी फेरिस्त सोबत गुदरलेले आहेत. रस्ता झाले बाबतची बाब अपेलंट यांना चांगले माहिती असुनही केवळ जाबदार यांना शारीरिक, मानसिक व आर्थिक त्रास देण्याच्या दुष्टहेतुने प्रस्तुतचे अपील प्रलंबीत ठेवलेले आहे. तसेच सर्व अपेलंटे हे मे. कोर्टा समोर हजरही राहत नाहीत. त्यामुळे वरील वस्तुस्थितीचा विचार करता अपेलंटचा अपीलात व मुळ स्थगीती अर्जात कोणत्याही प्रकारचे तथ्य राहत नसल्याने दोन्हीही रद्द होण्यास पात्र आहेत.

**जाबदार ७ ते १५ व २१ ते ३३ व ३९ यांनी त्यांचे लेखी युक्तीवादामध्ये सारांशरूपाने मुद्दे मांडले आहेत.**

१. अपेलंट ने केलेले अपिल व त्यातील मजकूर खोटा लबाडिचा असल्याने तो जाबदार यांना मान्य व कबुल नाही. अपेलंट यांनी चूकीचे कारण नमुद करुन जे अपील दाखल केले आहे. ते चालनेस पात्र नाही. सबबत ते रद्द करणेत यावे.

२. प्रस्तुत जाबदार हे खालील कोर्टात देखील रस्ता होणेबाबत हरकत नाही असे सविस्तर म्हणणे दिले आहे. अपेलंट यांनी अपिलात नमुद केल्याप्रमाणे दुसरा कोणताही रस्ता नाही. या सर्व बाबीचा खालील कोर्टानी विचार करुन जो रस्तेबाबत निर्णय दिलेला आहे. तो बरोबर आहे. सदर रस्तेलगत जाबदार च्या देखील जमीनी आहेत. अपेलंट म्हणतात त्या प्रमाणे कुठल्याही प्रकारे पिकाचे नुकसान होत नाही. अपेलंट यांनी अपिलात बागयत पिकाचे नुकसान होत आहे हे केलेले कथन चुकीचे आहे.

३. अपेलंट यांनी प्रस्तुतचे अपिल दाखले केलेनंतर या अपेलंट व जाबदार मध्ये गावपातळीवर प्रतिष्टीत लोकासमक्ष आपसात तडजोड झाल्याने अपेलंट यांनी जाबदार नं. १ ते ६ यांना रस्ता करणेबाबत तोंडी सहमती दिल्यामुळे जाबदार नं. १ ते ६ यांनी भरपूर पैसे खर्च करुन तहसिलदार यांचे आदेशाप्रमाणे रस्ता तयार केलेला आहे. सदर रस्त्यानेच अपेलंट व जाबदार ये जा करीत आहेत. सदर अपेलंट यांनी जाबदार यांना शारीरीक व मानसिक त्रास देण्याच्या दृष्ट हेतुने प्रस्तुतचे खोटे अपिल दाखल केलेले आहे. तहसिलदारसो यांचे आदेशाप्रमाणे रस्ता जाबदार यांनी अपेलंट यांच्या तोंडी सहमतीने तयार केला आहे. सदर रस्त्याने अपेलंट व जाबदार यांची छोटी मोठी वाहने जात आहेत. अपेलंट यांच्या अपिलात कोणतेही तथ्य नसल्याने ते रद्द होणेस पात्र आहे.

**जाबदार १६, १९ व २० यांनी त्यांचे लेखी युक्तीवादामध्ये सारांशरूपाने मुद्दे मांडले आहेत.**

१. अपिलार्थी यांनी दाखल केलेले अपील व अपिलार्थी यांनी अपिलात मांडलेली वस्तूस्थिती खरी असून बरोबर आहे. जाबदार १ ते ६ यांनी रस्ता मागणी करीता कोणताही अर्ज केलेला नाही. अर्जावर सहया केलेल्या नाहीत. जाबदार १६,१९ व २० यांनी देखील मागणी केलेली नाही. सहया केलेल्या आहेत त्या खोटया आहेत. दादासो मयत असून त्यांची देखील खोटी सही केलेली आहे.

२. अपिलार्थी व जाबदार यांना पूर्वी पासून रस्ता वहिवाटीचा होता व आहे. त्याच रस्त्याने वहिवाट करीत आहे. सदरच्या जमीनी या पाच दहा गुंठयांच्या आहेत. विहीरी आहेत, मोठी लिंबाची झाडे आहेत. तहसिलदार यांनी दिलेला आदेश चुकीचा आहे. तहसिलदार यांचा आदेश रद्द करणेत यावा.

**अपिलार्थी यांनी प्रकरणी दाखल केलेला अपील मेमो, जाबदार यांचा लेखी युक्तीवाद प्रकरणी दाखल कागदपत्रे यांचे एकत्रित अवलोकन करता माझे निष्कर्ष खालीलप्रमाणे आहेत.**

१. तहसिलदार, जत यांनी दिलेल्या क्र.जमिन/कलम-१४३/रस्ता/एसआर/०२/२०२२, दिनांक १०.०१.२०२३ यावर व्यथित होऊन तो रद्द करावा म्हणून अपिलार्थी यांनी सदरचे अपील केलेले असून सदर निर्णय रद्दबातल करून मिळणेबाबत विनंती केली आहे.

२. प्रस्तुत प्रकरणी जाबदार १ ते ६ यांची मौजे आवंढी, ता. जत येथील गट नंबर २७६ व २६५ ची शेतमिळकत आहे. सदर मिळकतीस जाणे-येणेसाठी प्रस्तुत जाबदार यांना रस्त्याची आवश्यकता असले कारणाने त्यांनी तहसिलदार जत यांचेकडे महाराष्ट्र जमीन महसूल अधिनियम १९६६ चे कलम १४३ अन्वये नवीन रस्त्याची मागणी केलेली आहे. त्याअनुषंगाने तहसिलदार जत यांनी प्रत्यक्ष स्थळपहाणी व पंचनामा करून गट नंबर २७६ व २६५ या शेतजमीनीमध्ये जाणे-येणेसाठी व शेतमाल वाहतूकीसाठी स.नं.२५४, २५५, २५७, २६४, २६९, २६५ चे पुर्व बाजूस तसेच स.नं.२१७, २५९, २६९ चे पश्चिम बाजूस असलेल्या दक्षिस उत्तर चालीचे सरबांधावरून अथवा सरबांधालगत पश्चिम बाजूस म्हणजे स.नं.२५४,२५५, २५६, २५७, २५८, २६४, २६५,२६९ चे पुर्व बाजूस असलेल्या दक्षिण उत्तर चालीचे जमीनीचे सरबांधावरून रस्ता उपलब्ध करून दिलेचे दिसून येत आहे. सदर रस्ता मंजूर करणेची तहसिलदार यांनी केलेली कार्यवाही ही योग्य व कायदेशीर असल्याचे दिसून येत आहे.

३. वास्तविक, अपिलार्थीचे मिळकतीमधून नेमका कोणत्या स.नं वरून आदेश केलेला आहे ते समजून येत नाही, जाबदार ७ ते ३९ हे खालील कोर्टात हजर झालेले नाहीत, जाबदार १ ते ६ यांनी कोर्टाची दिशाभूल करून आदेश केलेला आहे, त्यांना पर्यायी रस्ता आहे. त्यामुळे सरबांधावरील रस्त्याची मागणी बेकायदेशीर आहे. या वादीच्या दाव्यात कोणतेही कायदेशीर तथ्य दिसून येत नाही. जेव्हा शेतक-यास

शेतात जाणेसाठी रस्त्याची निकड असते तेव्हाच महाराष्ट्र जमीन महसूल अधिनियम १९६६ चे कलम कलम १४३ अन्वये नव्याने रस्ता मंजूर करणेचे अधिकार तहसिलदार यांना आहेत.

४. तहसिलदार यांना सर्वसमावेशक विचार करून नक्की कोणता रस्ता द्यावा याबाबत अधिकार आहेत. त्यामुळे तहसिलदार जत यांनी त्यांना महाराष्ट्र जमीन महसूल अधिनियम १९६६ चे कलम १४३ अन्व्ये प्राप्त अधिकाराचा वापर करून प्रतिवादी यांना शेतजमीन वहिवाटीसाठी दिलेला रस्ता उचीत, न्याय व कायदेशीर आहे असे माझे मत झाले आहे. यास्तव तहसिलदार,जत यांचे निर्णयात फेरबदल करण्याची आवश्यकता वाटत नसल्याने मी, अजयकुमार नष्टे, उपविभागीय अधिकारी जत, उपविभाग जत पुढीलप्रमाणे आदेश पारीत करीत आहे.

**आ दे श**

**निकालपत्रात नमूद कारणास्तव अपिलार्थीचे अपील अर्ज फेटाळण्यात येत आहे.**

खर्चासंबंधी कोणतेही आदेश नाहीत.

सदर आदेशाची अंमलबजावणी अपील कालावधी नंतर करणेत यावी.

सदर निकालाची समज सर्व संबंधीताना देणेत यावी.

प्रस्तुत निकालपत्र www.eqjcourts.gov.in या वेबसाईटवर पहाणेस उपलब्ध आहे.

ठिकाण - जत
दिनांक -२४.०२.२०२४

(अजयकुमार नष्टे)
**उपविभागीय अधिकारी**
**जत उपविभाग जत**

प्रत -तहसिलदार जत, यांना माहितीसाठी व पुढील कार्यवाहीकरीता रवाना.